# राजतंत्र

वर्ष : २२ अंकः ९ पालघर, शुक्रवार, दिनांक १८ ऑक्टोबर २०२४ पानेः ४ किंमतः १/-रुपया


# वर्ल्ड ट्रेड एक्सपो: भारताचा विकसनशील देशांबरोबर व्यापार वाढवण्यावर भर, आफ्रिकेशी संबंध अधिक घट्ट होण्याची संधी

**मुंबई:** वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबई आणि ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज यांनी वर्ल्ड ट्रेड एक्सपो आयोजित करून विकसनशील देशांसोबत व्यापार आणि सहकार्य वाढवण्यास चालना दिली आहे. आज भारताच्या निर्यातीचा मोठा वाटा युरोप आणि अमेरिकेसारख्या विकसित देशांकडे जातो, परंतु, हा एक्सपो लॅटिन अमेरिका, आफ्रिका, आशिया आणि इतर खंडातील विकसनशील देशांना एकत्र आणून नवीन व्यावसायिक संधी निर्माण करतो, असे महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी उद्घाटनपर भाषणात सांगितले.

''विशेषत: आफ्रिका हा जागतिक विकासाचा एक प्रमुख भाग आहे, जिथे भारताला निर्यात, कौशल्य विकास, शेती, खाणकाम आणि पर्यटन क्षेत्रात प्रचंड संधी आहेत,'' असे राज्यपालांनी पुढे म्हटले. ''आपण आफ्रिकेसारख्या विकसनशील देशांबरोबर व्यापार आणि गुंतवणूक वाढवावी,'' असा त्यांचा आग्रह होता.

हिरव्या ऊर्जेतील महाराष्ट्राची प्रगती: या वर्षीचा 'इनोव्हेशन फॉर सस्टेनेबिलिटी' हा विषय खूपच महत्त्वपूर्ण आहे. '२०७० पर्यंत कार्बन उत्सर्जन शून्यावर आणण्याचा भारताचा संकल्प हा एक मोठा टप्पा आहे,' असे राज्यपाल म्हणाले. त्यांनी महाराष्ट्रातील हरित ऊर्जेतील प्रगतीबद्दल कौतुक व्यक्त केले. 'सातारा जिल्ह्यातील 'मन्याची वाडी' हे गाव राज्याचे पहिले १०० टक्के सौरऊर्जा गाव ठरले आहे, हे महाराष्ट्राच्या हरित उर्जेतील पुढाकारांचे द्योतक आहे,'असे त्यांनी सांगितले.




**महत्वाचे मुद्दे**

महाराष्ट्रातील सौरऊर्जा क्षमता सध्या ५०८० मेगावॅट आहे, आणि २०२५ पर्यंत ती १२,९३० मेगावॅटपर्यंत पोहोचवण्याचे उद्दिष्ट आहे.

**ग्रीन हायड्रोजन निर्मिती:** महाराष्ट्राने ५०० किलोटन ग्रीन हायड्रोजन वार्षिक उत्पादनाचे लक्ष्य ठेवले आहे. राज्यपालांनी या धोरणाचे कौतुक केले आणि ''२०३० पर्यंत भारताचे ५ दशलक्ष मेट्रिक टन ग्रीन हायड्रोजनचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी महाराष्ट्र महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल,'' असे स्पष्ट केले. उद्योग–शिक्षण सहकार्य: राज्यपालांनी उद्योगांना संशोधन, विकास आणि कौशल्य विकासासाठी राज्यातील विद्यापीठांशी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

हरित ऊर्जा सहकार्याची संधी: राज्यपालांनी ३७ सहभागी देशांना महाराष्ट्रातील हरित ऊर्जा प्रकल्पांमध्ये भागीदारी करण्याचे निमंत्रण दिले आणि या एक्सपोमुळे नवीन भागीदारी आणि सहकार्य निर्माण होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली.